December 2011

"मित्रा, बोधप्रद आविर्भाव टाळलाच पाहिजे रे ! तुझा आवाका मोठा असूनही तू ते सगळे एका कोंदणात बसवायचा प्रयत्न कशासाठी करतोस ? तसे न करताही पोचेल ते. विचार कर. आणि लाख्यांनी म्हटल्याप्रमाणे ' वगैरे ' ही नको. उगीचच तुझ्याकडे चेल्याची भूमिका येण्याची शक्यता कशाला ? कवी हा गुरू अथवा चेला दोन्ही असू नये, असे मला वाटते."

"आयुष्य म्हणजे घटना, असे जेव्हा होते तेव्हा ते निरर्थक आणि कंटाळवाणे होते."

"नुसत्या स्पर्धाच नव्हे, वर्तमानपत्री परीक्षणे, तथाकथित समीक्षकांचे आढावा-लेख, प्रेक्षकांची उदासीनता आणि आळस -- अशा अनेक गोष्टी सांस्कृतिक कृतींचा नाश करताहेत -- सध्या, आपले काम करत राहणे हेच महत्त्वाचे !"

"एखादा कवी म्हणतो की तो ' दुःखाचा ' कवी आहे, एखादा ' आनंदयात्री ' असतो तसेच वैफल्यवादी, हिंसावादी, लैंगिकतावादी -- असेही विभाग करावे !"

"व्यक्तिगत गुण, काम, यश, घटना यांच्या आनंदात इतरांना सहभागी करून घेता येईल पण ज्या त्या संबंधांप्रमाणे वेगवेगळ्या प्रमाणांत -- ' जसेच्या तसे ' नाही. जसाच्या तसा आनंद पसरायचा असेल तर तो व्यक्तिगत नसावा लागेल. असा काही आनंद असू शकेल का, हा प्रश्न आधी पडायला हवा."

अतिरिक्त
"मूळ चेहरा म्हणजे ? तो लिंपण नसतो ?"

(मोकळं आभाळ)
"स्वतःला जी गोष्ट आभाळासारखी मोठी वाटत असते ती दुसऱ्याला सांगितल्यावर त्याला तशी वाटत नाही, ते किरकोळ गोष्टीचे उदात्तीकरण वाटू शकते. कविता ही कवीपुरतीच प्रस्तुत राहून चालणार नाही."

Photo
Timeline Photos

"मागे दिसणारा पांढरा पुंजका ढगही असेल वा लाटही असेल ! सुंदर संध्याकाळ ! थोड्याच वेळात निर्मनुष्य अंधार पडेल ! सावल्या जातील ..."

"If truth is the contrary of lie, clarity is not the contrary of either."

"Love can be proved only by fulfillment of interests. Nothing to be glorified."

"स्त्रीसुद्धा ज्या अर्थी प्रेमासाठी एखादी व्यक्ती ' निवडते ' आणि एखादी व्यक्ती ' टाळते ' त्या अर्थी तिथेही गणित असतेच ! फार तर प्रकार वेगळा असेल !"

ज्या ज्या गोष्टी असंख्य प्रभावांनी युक्त आहेत त्या त्या सगळ्या आभासमयच समजाव्या लागणार कारण त्याच तशाच प्रभावांची अवस्था पुन्हा कधीच कुठेच नसणार."

"जेकेही म्हणतात की To be is to be related. -- हेही विचारात घ्यावे."

"एक म्हणजे आचरणात / आकलनात असणे आणि दुसरे म्हणजे त्याची बौद्धिक मांडणी -- हा भेद मांडायचा असावा. समीक्षेच्या क्षेत्रात आधुनिक, उत्तरआधुनिक यांची बौद्धिक मांडणी जगभर झालेली आहे. आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या प्रत्येक कलाकृतीत आधुनिकतावादात सांगितलेली सर्वच वैशिष्ट्ये असतील असे नाही."

"मी मुद्दामच ' सुसंवादित्व ' म्हटलेले नाही. ' ससंवादित्व ' म्हटले आहे. अर्थसंपृक्तता, सूचकता यांबरोबरच मला मुख्यतः आशयाशी असणारे आंतरिक संवादित्व यावर लक्ष केंद्रित व्हावे असे वाटते. कवितेचे घटक विसंवादीही असू शकतील पण कवीच्या भानाशी ते संवादी असतील. ' ससंवादित्व ' ही संज्ञा नवीन असल्याने तिचा अर्थ आपल्या चर्चेतून ठरत गेला तरी चांगलेच आहे. ' लय ' ही संज्ञाच मला रस्ता भरकटवणारी वाटते आहे."

"१. लय ही तांत्रिक बाब असते का ? तसे असेल तर तिला कलेच्या क्षेत्रात मूल्यात्मक महत्त्व असायचे कारण नाही. २. लय ही सुखसंवेदना असते का ? तसे असेल तर सुखसंवेदनेच्या प्रत्येकाच्या अपेक्षा वेगवेगळ्या असल्यानेही ती मूल्यात्मक महत्त्व घालवून बसेल. ३. लय ही श्रुतीसंवेदनेशी संबंधित असल्याने एकूण कलाक्षेत्रात मूल्यात्मक कार्य करायला अपुरी संकल्पना आहे का ? त्यापेक्षा ' ससंवादित्व ' अशी एखादी संकल्पना मूल्यात्मक चर्चेसाठी अधिक उपयुक्त ठरेल का ? ( हे ससंवादित्व आशयावर अधिक लक्ष देऊ शकेल का ? )"

"ठराविक कालावकाशात होणारी आणि विविधतेमुळे गोड वाटणारी पुनरावर्तने म्हणजे लय, असे समजूनच ही चर्चा चाललेली दिसते. गणित आणि नाद यांची सांगड म्हणजे लय -- हा नियम कवितेलाच काय, कुठल्याही कलाकृतीला लागू पडू शकतो ?"

"आशयाची आंतरिक लय ही संगीताप्रमाणे गणिताने सिद्ध होत नाही. ती असते अनुभवाच्या चढउतारांबरोबर जाणारे आकलनभान. हे भान खोटे म्हणजे अवलंबलेले असेल वा त्यात भेसळ होणे, नैतिक, वैचारिक अशा कुठल्याही सवयींचे प्रभाव पडणे असे घडत असेल आणि त्यांमुळे त्या भानाला कमीजास्त मर्यादा पडत असतील तर कोणत्याही कलाकृतीची आंतरिक लय बिघडते."

युनिकोड मराठी फुकट उपलब्ध असूनही जे मित्र इंग्रजी स्पेलिंगचे मराठी वाचायला लावतात त्यांचे वाचायचे नाही, असा मी माझ्यापुरता निर्णय घेतलेला आहे. बाकीच्यांचे वाचून बोलतोय. इंग्रजीतही कविता भावनिक असलीच पाहिजे असे मानण्याचा एक काळ होता. उपरोध, विनोद असलेल्या चॉसर किंवा पोप यांच्या कवितेला कविता म्हणावे का असे वाद झाले. मराठीत तर भावनिकतेचा आग्रह वर्षानुवर्षे आहे. मला हे पटत नसल्यानेच काही वर्षांपूर्वी ' सत्यकथे ' त मी एक लेख लिहिला होता -- ' कवितेतील अ--भाव '. सारांश, कवितेच्या बाबतीत अमुकच अशा हेकट अपेक्षा टिकत नाहीत असे मला वाटते. माझी ' इमारत ' नावाची कविता गद्य उताऱ्यातच लिहिलेली आहे. ती ' सत्यकथे ' त कवितेच्या विभागातच छापली गेली होती. अर्थसंपृक्तता, सूचकता ही मला कवितेची मुख्य वैशिष्ट्ये वाटतात. आशयाची आंतरिक लय तर कुठल्याही कलकृतीला लागतेच. गेयता किंव सांगितिक लय या कवितेच्या बाबतीत मला किरकोळ गोष्टी वाटतात.

"विवेकवाद हा बुद्धीचाच भाग असल्याचा पेच यात मला दिसतो. असो. अध्यात्म म्हणजे ' एकविध मन ' हे तुकारामाच्या भाषेत म्हणता येईल."

विज्ञान, गणित, तंत्रज्ञान अशा बाबतींतला बुद्धीचा उपयोग निर्विवाद आहे. तो प्रश्नच नाही. मानवी संबंधांत बुद्धी जी वाट लावते, तो आहे प्रश्न. फूट, अविश्वास, संघर्ष, हिंसा यांचा गोंधळ आणि सर्व उतारे, आदर्श, मार्ग यांचे सततचे अपयश हीच आहे बुद्धीची या क्षेत्रातली कामगिरी. ही घाण, दुःख, पीडा बघून, या क्षेत्रातला बुद्धीचा वापर नुसता संशयास्पदच नव्हे तर घृणास्पद आहे, यात दुमत होण्याचे कारण नाही. समजा एका जोडप्यात घटस्फोटाची वेळ आलेली आहे, पत्नीला तिच्या पतीबरोबर राहणे शक्यच नाही. घटस्फोटाचा निर्णय घटस्फोट व्हायच्या आधीच घ्यावा लागणार हे तर स्पष्टच आहे. या वेळी जर पती म्हणाला की मीच आहे तुझा आधार, नंतर तू काय करणार, नंतरही प्रत्येक गोष्टीला तू माझी मंजुरी घ्यायला हवीस, तर पत्नी म्हणेल, यू आर रिजेक्टेड – गेट लॉस्ट ! तसेच मानवी संबंधांच्या क्षेत्रातल्या बुद्धीचे आहे. ती रिजेक्टच

केली पाहिजे अशी अवस्था आहे. या क्षेत्रात कवडीची लायकी नसलेल्या, उलट वाताहात करणाऱ्या, दुःख, छळ, भीती, पीडा यांची पैदास करणाऱ्या बुद्धीकडून, तिला नाकारल्यावरही, मान्यता घेण्याचे कलम कसे काय समर्थनीय ठरते ? अध्यात्माने असल्या भंगार बुद्धीच्या परीक्षेत पास व्हायची गरज काय ? नाकारल्या गेलेल्या गॉष्टीला पुन्हा देव्हारा ? असली अंधश्रद्धा बुद्धीच्या निकषांत तरी बसते का ? मानवी संबंधांच्या क्षेत्रातल्या बुद्धीला लाथ घालून नाकारणे ही अध्यात्माची पहिली पायरी आहे. तसे करणे हे बुद्धीला पटवण्याची काळजी, हे निव्वळ वेडेपणातच जमा होईल. नाकारलेल्या गोष्टीच्या टेस्टला नंतरचेही सगळे उतरत गेले पाहिजेअसे म्हणणे म्हणजे नुसते आहे तसे तडफडत मरा असे म्हणणे तर आहेच पण कदापीही या नरकाच्या बाहॅरची शक्यताही कुणी शोधता कामा नये, अशी हुकुमशाही आज्ञाही आहे. असल्या आज्ञा न जुमानणारे निघतच राहतात !

"जी गोष्ट मानवी मनाची पूर्ण रचनाच बदलणारी असेल, त्याची कार्यपद्धतीच बदलणारी असेल तीबद्दल त्याच जुन्या व्याख्येच्या भाषेत बोला असे म्हणण्यात काही अर्थ नाही. अमर्याद भानाची मर्यादित व्याख्या हे तथाकथित बुद्धिवादी मनच मागते ! बुद्धी हे या विश्वातले सर्वस्व हे बुद्धीच गृहीत धरू इच्छिते !"

"सदगुण, दुर्गुण, आत्मरती, संयम -- हे सगळे मानवी विदीर्णतेच्या ढोंगी क्षेत्रातले शब्द आहेत. विदीर्ण मनाला अध्यात्माची टिंगल करावीच लागते, त्याशिवाय त्याचा आळस समर्थनीय ठरत नाही. अध्यात्म म्हणजे धंदेवाईक मराठी नाटकांतून मांडली जाणारी नैतिक चौकट नव्हे.अध्यात्म म्हणजे काहीतरी सपक, बुळबुळीत आणि निर्जीव काहीतरी असते, असे स्वतःला पटवत राहिले म्हणजे आपणच खरे या जीवनसंग्रामातले शूरवीर असे इतरांनाही दाखवता येते. एकाच मानसिक पॅटर्नचे रटाळ, कंटाळवाणे आणि सदोदित वैतागलेले जगणे हे खरे तर अध्यात्माच्या अभावात असते. काळज्या, भीती आणि हिंसा यांनी युक्त जगणे कोणती अस्मिता बाळगण्याजोगे आणि गौरवास्पद असते ?"

"तुकाराम म्हणतो तसे ' एकविध मन ' ( एकात्म मन -- integrated mind ) म्हणजे अध्यात्म आणि विदीर्ण मन म्हणजे अध्यात्माचा अभाव -- थोडक्यात. अध्यात्म नको म्हणजे सवयीच्या विदीर्णतेच्या मार्गानेच जाऊ आणि याशिवाय दुसरे काही शक्य नाही हे गृहीत धरू."

"अपमान, फसवणूक, अन्याय, मनाविरुद्ध घडणे, अपयश येणे अशा असंख्य जखमा मनात वागवतच जगायला पाहिजे का -- हा प्रश्न समजा अध्यात्मिक आहे, म्हणून विचारायचाच नाही ! फुकट मरायला कुणालाच कुणाची बंदी नाही ! पिढ्यांचे हिशोब आणि अभिमान इथे कुचकामी ठरतात. अशा हजारो पिढ्या आल्या आणि गेल्या !"

"असंख्य मानसिक रोग, क्रॉनिक रोग आणि हृदयविकाराने तरुण वयातही मरणाऱ्यांचे प्रमाण वाढत जाणे यात अध्यात्माचा अभाव हे एक अतिमहत्त्वाचे कारण असू शकते -- पिढीचा काय संबंध ? कुठल्याही जिवंत माणसाने लक्ष दिले पाहिजे असा हा विषय आहे. अपमान होणे, जवळचे कुणी गेल्याचे दुःख होणे वा त्याचा शॉक बसणे, भीतीने वाट लागणे -- हे सगळे कुणाचेही होऊ शकते -- यात पिढीचा काहीही संबंध नाही. हवे तर याकडे पाहा नाही तर नका पाहू -- एवढेच --"

सुशिक्षित – अशिक्षित, श्रद्धावान - बुद्धिप्रामाण्यवादी, कम्युनिस्ट – मूलतत्त्ववादी, आस्तिक – नास्तिक, हिंसावादी – अहिंसावादी वगैरे सर्व तऱ्हांचे लोक हे मुळात अलगतावादी असतात. स्वतःला आयसोलेट करणे हा मानवजातीत शंभर टक्के पसरलेला विध्वंसक रोग दिसतो. ‘ प्रेमाने, बंधुभवाने राहू ‘ अशी वाक्ये वेडपट ठरतात ते त्यामुळेच. हे तर अध्यात्माशिवाय, बुद्धीनेही समजायला अडचण नसते. इथे एखाद्याला असा प्रश्न पडू शकतो की माणसाला अशा अलगतेशिवाय – आयसोलेशनशिवाय – जगणे शक्य आहे का ? – हा झाला अध्यात्मिक प्रश्न. कारण याला तथाकथित बौद्धिक, सुभाषितांची अशी उत्तरे चालत नाहीत. हा प्रश्न विचारायलाही बंदी करणारे, याची टर उडवणारे लोक अलगता, हिंसा, नाश गृहीत धरणारे निराशावादी, बेजबाबदार लोक असतात. प्रत्येक संबंध संघर्षमय का, सगळीकडे फूट का पडते, माणसाचे मन विदीर्ण का, सगळीकडे बेफिकिरी, छळ, क्रूरपणा, स्वार्थ, डावपेच, दडपशाही यांचे थैमान का चालू आहे, माणसाच्या बुद्धीचा या प्रश्नांवर उपयोग काय – असे प्रश्न पडणे म्हणजे अध्यात्माच्या क्षेत्रात प्रवेश करणे. अध्यात्म हे वेड्या, पळपुट्या लोकांचे क्षेत्र आहे असे समजणारे तथाकथित बुद्धिवादी लोकच खरे तर हे सगळे महत्वाचे प्रश्न टाळत असतात आणि आदर्शवादाच्या किंवा निराशावादाच्या पळवाटा शोधत असतात. बुद्धी, कल्पना, स्वप्न हे सगळे बाराच्या भावात जात असताना काहीच प्रश्न न पडणाऱ्या लोकांना एकूणात ' मृत ' का म्हणू नये ?

"वाचनालयात जाऊन पुस्तके बदलून आणून या पद्धतीने वाचणारे किती आहेत याबद्दल शंका वाटते. सहज उपलब्ध असणे हा या नव्या प्रकारातला सर्वात महत्त्वाचा गुणविशेष आहे. वेळ नसण्याच्या जगात ही मोठीच सोय ठरेल !"

"नोट चांगलीच आहे, त्यात एक मालाडचा उल्लेख आहे, ५६ ते ६७ मीही मालाडमध्येच होतो."

"संस्कृत २००३ हा फाँट चांगला आहे."

"इथे एफबीवर बोलताना थोडी गैरशिस्त, थोड्या व्यक्तिगत आवडी याही व्यक्त होणारच. इथे सगळे अभ्यासाची, विवादाची सवय असलेलेच असतील असे नाही. जगाच्या या कोपऱ्यात का असेना इथे मित्रमैत्रिणी अशा विषयावर चर्चा करत आहेत ही मला महत्त्वाची गोष्ट वाटते. त्यामुळे, यातले चूक-बरोबर ठरवण्याची घाई न करता चर्चा पुढे जाऊ द्यावी, असे मला वाटते."

Timeline Photos

'दै. लोकसत्ता'नं 'नग्नता:चित्रातली आणि मनातली' अंकावर एक खूप मोठा आणि छान अभिप्राय प्रसिद्द केला आहे...तो जरुर वाचा...!!

जीवनसंध्यासुक्त

नकळत पान्हा चुरतो
हा मेघ सावळा भोळा
स्वप्नांची चादर हलता
हा उंट भरजरी उठला

पत्रोत्तर लिहिता लिहिता
मनमोर दिगंती गेले
येताना हलली पाने
पक्ष्यास पिसे जडलेले

आगीचे अनुभव अंती
माघाच्या कुशीत विरले
पाउले परत फिरताना
राउळी भुतांचे मेळे

एकच मृगजळ आता
तहान ही मातीची
मातीचे अत्तर होता
राख राख विभवाची ...

-- मित्रांनो, ही घ्या माझी आणखी एक निर्मिती. एखाद्या शैलीच्या अंमलबजावणीतून जर चांगल्या कवितेचा आभास तयार होत असेल तर अशा शैलीपासून सर्वांनी सावध राहावे, एवढेच सुचवणे आहे. ( विभवाची म्हणजे वैभवाची. )

जीवनसंध्यासुक्त

अगदीच तमाने जेव्हा
लाजेला दिधली चोळी
जोडवी तरुण विधवेची
वाळूत लाघवी हसली

-- हेही चालेल का बघा. बनावट अर्थात माझीच."

जीवनसंध्यासुक्त
"वरील चार ओळी मी ' बनवलेल्या ' आहेत, त्यांचे क्रेडिट मला मिळावे, ही विनंती."

जीवनसंध्यासुक्त

"अंधार पाहुनी बुजरा
पैंजणे नभावर ठसली
हा न्याय नसे राधेला
ही वात कधीची विझली

--- असे असल्यावर काय, प्रश्न काय आहे ?"

"मराठी रंगभूमीवर खरोखर दुबेजींचे प्रचंड काम आहे ! त्यांना बरे वाटावे हीच सदिच्छा !"
September 25

"तुम्ही सेंट्रलाईट असल्याचे दिसले. बरोबर ? मीही !"

वर्गीकरण ? ! ...

"विचारक्रियेने यांतल्या एकालाच निर्णायक महत्त्व देणे ही चुकण्याची खात्रीच समजावी. जगणे सगळे मिळून असावे आणि नुसते स्वहित हाच हिशोब न मानता समग्रावधानाने पूर्ण जगावे."

"स्वतःच्या प्रतिमा सादर करणारे आणि आपापल्या प्रतिमांतून त्या प्रतिमा पाहणारे, या गोंधळातच आपण आणि इतर असतो. दोन्ही ' दिसणे ' याचाच भाग. काय प्रभावी हे त्या त्या वेळी त्या त्या प्रतिमांवर ठरणार."

NA TUM HAMEIN JAANO - Hemant Kumar/Suman Kalyanpur - BAAT EK RAAT KI (1962) {Both Version}

www.youtube.com

"त्याच चित्रपटातले ' अकेला हूँ मै ' -- हे एक अमर गाणे."

अमुक सैनिकांनी तमुक युद्धकैद्यांच्या तोंडांना त्यांची तोंडे उघडी ठेवणारे चाप लावले आणि त्यांत ते भळाभळा मुतले, अमुक काळी सरदार जर खाकरला तर गुलामाने अदबीने तोंड उघडून उभे राहावे, त्यात तो सरदार थुंकणार आणि गुलामाने किळस न दाखवता ते गिळले पाहिजे, अशी पद्धत होती ( तसे न घडल्यास भयानक शिक्षा ), एक क्रूरकर्मा शत्रूचे पाय तोडून, त्याच्या समोर ते शिजवून खाई आणि सकाळी तो जाऊन आल्यावर, त्या पायांचे काय झाले ते त्या शत्रूला दाखवले जाई. अशा मानवी कल्पकतेच्या भराऱ्या खूप असतील. एकूणात, मला संताप आणून माझे स्वास्थ्य बिघडवतो म्हणजे काय ? ते कारण चेचायचा मला अधिकार आहेच -- अशी ही धारणा आहे. अमुक भ्रष्टाचार, तमुक हिंसा चालेल पण ढमुक वाईट, हे प्रत्येकाचे वेगवेगळे ठरलेले आहे. त्यामुळे, सगळेच कुणाला ना कुणाला समर्थनीय वाटते आहे. माझेच बरोबर हे तर सगळ्यांनाच वाटते आहे. उदा. मी करतो ते न्यायासाठी, वगैरे. मला जे जे वाटते ते ते सत्य आणि समर्थनीय, हे प्रत्येकाचेच आहे. -- असा हा सगळा मिळून एकच प्रश्न असावा असे दिसते.

"तथाकथित धर्मांची नशा, विचारसरणीची नशा, कोणत्याही अस्मितेची नशा आणि मुख्य म्हणजे करमणुकीची नशा, अशा गोष्टींशिवाय माणसाला जगणे शक्य आहे की नाही, हा प्रश्नही कुणी स्वतःला वा दुसऱ्याला विचारायचा नाही, हे सर्वांचे पक्के ठरलेले आहे."

"अण्णांच्या विरोधी बोलतो म्हणून, कम्युनिस्ट नाही म्हणून, हिंदुत्ववादी नाही म्हणून, आपल्या जातीचा नाही म्हणून, कविता आवडत नाही म्हणून, कविता आवडते म्हणून, सलमान आवडतो म्हणून, असे जर आपण एकेकाला उचलून फेकू लागलो तर शेवटी ते स्वतःलाच फेकणे ठरेल कारण आपण एकटे उरू."

"And feeling has to be nothingness; if it is somethingness, it goes to the category of ' doubtful. '"

"अरे वा, तुम्ही असे चांगले चित्रकार आहात हे माहीत नव्हते. छानच !"

"एरवी तुकारामाला मानायचे पण ' ठायीच बैसोनी करा एकचित्त ' हा त्याने सांगितलेला धर्म मानायचा नाही, आता आम्ही टिळकांना मानतो असे म्हणायचे आणि गणपती उत्सवात धुमाकूळ घालत सुटायचे, असा हा सगळा करमणूकप्रधान ढोंगीपणा आहे."

"आपल्या प्रतिमेला अनुसरून केलेले आणि तिचीच अभिव्यक्ती असलेले काम हे रिपिटेटिव्ह काम. ( विशेषतः कलेच्या क्षेत्रात. )"

"ललित लेखनाच्या बाबतीत मी काही सुचवू इच्छितो. खपणारे लेखक आणि न खपणारे लेखक असे दोन विभाग करावे. खपणाऱ्या लेखकांची पुस्तके काढावी आणि बाकीच्यांना नेटकडे पाठवावे. हजारभराची आवृत्ती दहा दहा वर्षे खपवत बसण्यात काही अर्थ नाही. थोडेसे गुणवत्तेच्या अंगाने ते असे असेल ः -- वाईट लेखनाची पुस्तके होतील; अत्यंत वाईट, बरे आणि चांगले हे नेटवर जातील. विचक्षण वाचक त्यांना पाहिजे ते घेतील. या कामासाठी अगदी फार मोठी समिती लागेल, असेही नाही."

"अशा समितीचे मत काय असेल ते आधीच ओळखून मी माझे सर्व लेखन, काही पुस्तकांचा अपवाद वगळता, पीडीएफ मध्ये वेबसाईटवरच उपलब्ध ठेवलेले आहे."

"माझ्या माहितीप्रमाणे पाठारे नाही, पठारे. सत्तेचा, पैशाचा जसा माज आणि गैरवापर असतो तसाच तो विद्वत्तेचाही असतो. समीक्षेतही उपरोध वापरणे, टिंगलबाजी करणे, वगैरे. अत्यंत कोत्या निकषांच्या आधारावर नेमाड्यांनी खानोलकर / आरती प्रभू, पु. शि. रेगे यांना फालतू लेखक ठरवले. याचा अर्थ त्यांनी ते व्यक्तिगत आकसाने केले असेल असे नव्हे. त्याच पद्धतीने, बिनव्यक्तिगत आकसाने काहीजण त्यांच्याहीबद्दल असे बोलताना दिसतात. एकदा शेरेबाजी सुरू झाली की ती परवानगी सगळ्यांनाच द्यावी लागते. पण त्यातून काही सापडणे इतरांना अवघड जाते हे खरेच आहे."

"मनोरंजनाची इतकी भीक लागलेल्या समाजाला कसेही, कितीही लुटा, तो कुठेतरी टाळ्या वाजवत बसून राहील."

"भीती वाटणे, रडू येणे या गोष्टींची कविता करून, छान, सुंदर म्हणत एंजॉय करावे का, असा एक प्रश्न आला तर आपण काय म्हणू ?"

"आणि जो भूतकाळात अडकतो त्याचा वर्तमान मरतो !"

"परवा गौतम बुद्धाचे एक वाक्य वाचले ः-- सत्याच्या मार्गाच्या बाबतीत होणाऱ्या चुका दोन ः -- एक, तो मार्ग न घेणे आणि दोन, तो मार्ग अर्धवट सोडणे."

"काल्पनिक बोलुन फारसा उपयोग नाही. मानवी कृतींतून होणाऱ्या विध्वंसाच्या प्रलयाची आत्ताच आपण वाट पाहतोय असे खूपजणांना वाटतेय, ही वस्तुस्थिती आहे. ज्यांना आहे असेच त्यातल्या त्यात सुधारणा करत रेटायचे आहे त्यांना प्रचंड आशावाद टिकवता येवो अशी सदिच्छा व्यक्त करून मी सध्या आपला निरोप घेतो."

"पूर्वी, माझ्या आठवणीप्रमाणे, मोरारजी देसाई लोकांना म्हणाले होते, ' निर्भय बनो ' ! छान होता की सल्ला ! का नाही बनू शकले लोक निर्भय ? अलगतेत ( isolated ) असेपर्यंत असे ' चांगले ' सल्लेही जगण्यात अवतरणार नाहीत. लोक निर्भय बनले तर सगळी विषमता संपुष्टात येऊ शकेल. पण ... त्यामुळे, काय केले पाहिजे, या प्रबोधनाचा फारसा उपयोग नाही. मनाच्या अलगतेतच जगणे अपरिहार्य आहे का, हा खरा प्रश्न आहे, जो कधीही विचारायचाच नाही, हे आपले पक्के ठरलेले आहे ! त्यामुळे सगळा कळवळा वाया जातो ! मित्रांनो, मैत्रीतली चर्चा आहे, मलाही कुठलाही अधिकार नाही ! पण, कोण असू शकतात अधिकारी ?"

थोडा थोडा बदल होतो, या, त्या क्षेत्रात,पण, दुफळीचा, माणसांतल्या विदीर्णतेचा, गटातटांचा, त्यांतल्या संघर्षांचा मूळ प्रश्न असा हळूहळू सुटत नाही; कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तो तसाच राहतो आणि याचे कारण माणसाची जगण्याची अलगतावादी पद्धत हेच आहे, असे मला सुचवायचे आहे. समजा हा बौद्धिक क्षेत्राच्या बाहेरचा प्रश्न आहे, असे लक्षात आले तर लगेच, 'अधात्म ! अध्यात्म ! ' म्हणून फेटाळण्यात अर्थ नाही. उदाहरणार्थ, राष्ट्रवाद तसाच ठेवून ' एक जग ' होऊ शकत नाही. त्यामुळे, हळूहळू सुधारणा ही आत्मवंचनाच ठरते. यात नकारात्मकतेचा प्रश्न नाही. जे आहे ते आधी समजून तर घ्यायला हवे ! कुठे कुठे सुधारणा आहे, पण, एकूणात सगळे अधिकाधिक सडत का चालले आहे ? मानवी मनाची कामाची पद्धत अलगतावादी असेपर्यंत सत्ता, स्वार्थ, विषमता, अन्याय, हिंसा यांत फरक पडणार नाही, हे स्पष्ट आहे.

--- ००० ---